# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 16 January 2026
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १६ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीची मतमोजणी आज होत आहे. सुरवातीला टपाली मतांची मोजणी झाली. दुपारपर्यंत काही ठिकाणचे कल हाती येण्यास सुरुवात होईल. महापालिका निवडणुकांसाठी काल राज्यात सुमारे ५० ते ६० टक्क्यांपर्यंत मतदान झालं.

छत्रपती संभाजीनगर इथं चिकलठाणा औद्योगिक वसाहत, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, तसंच जालना रस्त्यावर सेंट फ्रांसिस शाळा या चार ठिकाणी मतमोजणी होणार आहे. या परिसरात वाहतुकीत बदल करण्यात आला असून, नागरीकांनी याची नोंद घेण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

जालना इथं औद्योगिक वसाहतीत सिद्धिकी इंजिनिअरिंग परिसरात, लातूरला महिला तंत्रनिकेतन इथं, तर नांदेडमध्ये शासकीत तंत्रनिकेतन महाविद्यालयात मतमोजणी सुरू आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जिल्हा प्रशासनाने मतमोजणीसाठी चोख नियोजन केलं असून, परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया आजपासून सुरू झाली. यामध्ये मराठवाड्यातल्या छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, आणि लातूर, या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचा समावेश आहे. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरता येणार असून, पाच फेब्रुवारीला मतदान तर सात फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

देशातल्या नवउद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या स्टार्टअप इंडिया या उपक्रमाला आज दहा वर्ष पूर्ण होत आहेत. १६ जानेवारी २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजपर्यंत भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता मिळाली आहे. २०१४ नंतर दीड लाखांपेक्षा जास्त नवीन उपक्रम सुरु झाले, सुमारे साडे १७ लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था ठरला आहे. व्यवसाय सुलभता, डिजिटल इंडिया आणि फंड ऑफ फंड सारख्या सुधारणा या यशामागील प्रमुख आधार आहेत.
या निमित्त आज नवी दिल्लीत भारत मण्डपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून युरोपीय कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कॉस्टा आणि युरोपीय कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देर लेयेन उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेलं आमंत्रण स्वीकारुन हे दोघे ३ दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून द्विपक्षीय चर्चा करतील. २७ जानेवारीला आयोजित भारत युरोपीय संघ शिखर परिषदेचं ते संयुक्तपणे अध्यक्षपद भूषवतील.

****

भारत २०१४ मध्ये २४९ गिगावॅट ऊर्जानिर्मिती करत होता, ती २०२५ मध्ये ५१० गिगावॅटपेक्षा जास्त म्हणजे जवळ जवळ दुप्पट झाली असल्याची माहिती, केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी दिली. नवी दिल्ली इथं राष्ट्रीय विद्युत शिखर परिषद २०२६च्या उद्घाटन समारंभात ते काल बोलत होते. भारताने विश्वासार्हता, सुलभता आणि लवचिकता याद्वारे ऊर्जा विपुलतेच्या एका नवीन युगात प्रवेश केला आहे. भारत आता जगातला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा वीज उत्पादक आणि ग्राहक आहे, असंही त्यांनी सांगितलं. देशाची जीवाश्म इंधन नसलेली क्षमता २०१४ मध्ये ३२ टक्क्यांवरुन आता २०२५ मध्ये ५२ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. त्यामुळे भारताने ऊर्जा संक्रमणात जागतिक नेतृत्व करणार्या देशांच्या यादीत स्थान मिळवलं असल्याचंही मनोहर लाल यांनी सांगितलं.

****

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात काल ५२ नक्षलवाद्यांनी सुरक्षादलासमोर शरणागती पत्करली. यामध्ये २१ महिलांचा समावेश असून, त्यांच्यावर एकूण एक कोटी ४५

लाख रुपयांची बक्षिसं होती. हे सर्व नक्षलवादी भैरमगड परिसरात कार्यरत होते. सरकारी पुर्नवसन योजनेनुसार शरण आलेल्या प्रत्येक नक्षलवाद्याला प्रत्येकी पन्नास हजार रुपयाचं अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

****

स्टेट बँक ऑफ इंडियाचे SBI YONO हे ॲप वापरणाऱ्या ग्राहकांना त्यांचा आधार क्रमांक अपडेट करण्यासाठी APK फाइल डाउनलोड आणि इन्स्टॉल करावी लागेल, अन्यथा हे ॲप ब्लॉक केले जाईल, असा संदेश समाज माध्यमांवर प्रसारित होत आहे. या संदेशाचे बँकेनं खंडन केलं असून, असा कोणताही दावा केला नसल्याचं म्हटलं आहे.

****

बीडचे आमदार सुरेश धस यांनी काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांची भेट घेऊन जिल्ह्यातल्या दुग्ध व्यवसायावर चर्चा केली. दुग्ध व्यावसायात वाढ होण्यासाठी उच्च प्रतीच्या गाईच्या बीजावर प्रती बीज पाच हजार रुपये अनुदान देण्यात यावं, त्यासाठी जिल्हा नियोजन विभागामार्फत वार्षिक दोन कोटीं रूपयांची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी धस यांनी केली.

तसंच आमदार धस यांनी, बीड जिल्ह्यातल्या ग्रामीण रूग्णालयातल्या कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांची भेट घेऊन चर्चा केली.

****